# प्रकरण - दुसरे

# पंढरपूर नगरपालिकेचे प्रशासन

# प्रकरण - दुसरे
# पंढरपूर नगरपालिकेचे प्रशासन

**प्रस्तावना :**

आपल्या भारत देशात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची विभागणी महानगरपालिका, नगरपरिषद, नागरी क्षेत्र समिती, निर्देशित क्षेत्र समिती,कॅन्टॉनमेन्ट बोर्डस् अशी केली आहे. नगरपरिषद स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या लोकसंख्येचा निकष राज्याराज्यांत वेगवेगळा आहे. महाराष्ट्र, म्हैसूर, उत्तरप्रदेश, पंजाब या सारख्या राज्यांत दहा हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरात नगरपरिषदा स्थापन केल्या जातात. नगरपलिकेसंबधीचे बहूतेक कायदे २० व्या शतकात करण्यात आले असले तरी स्वातंत्र्यानंतरच लोकशाही शासनाचा आधार या दृष्टीने नगरपालिका कायदयांना गती मिळाली. भारतामध्ये सर्वप्रथम मुंबई नगरपालिकेची स्थापना इ.स. १९०१ मध्ये मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियमाद्वारे करण्याात आली.[१] इ. स. १९५६ मध्ये राज्याची पुनर्रचना करण्यात आल्यामुळे नगरपालिकांच्या कायद्यात बदल करण्यात आले.[२] बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीमुळे दहा हजारावरील लोकसंख्या असलेल्या प्रदेशास ग्रामीण विभाग अशी विभागणी करण्यात आली. महाराष्ट्र नगरपालिका कायदा १९५६ नुसार  दहाहजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरी वस्तीसाठी नगरपालिका निर्माण करण्यात आल्या.[३] 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' या कायदयाची अंमलबजावणी इ. स. १९६७ पासून सुरू झाली. या कायदयामुळे १५,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रदेशाला "नगरपालिका म्हणून जाहीर करण्याचा अधिकार राज्यसरकारला देण्यात आला. पंढरपूर नगरपालिकेची स्थापना १२ ऑक्टोबर १८५५ रोजी करण्यात आली. नगरपालिकेची सर्व कामे 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' नुसार केली जातात.

## नगरपालिकेची रचना व निवडणूक :

नगरपालिकेच्या रचनेत व कार्यपध्दतीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी ७४ व्या भारतीय घटनादुरूस्तीमुळे नगर स्थानिक स्वराज्य संस्थाची रचना व कार्यपध्दती कशी असावी हे स्पष्ट करण्यात आले. महाराष्ट्र नगरपालिका कायदा व ७४ वी भारतीय घटनादुरूस्ती यानुसार लोकसंख्येच्या निकषावर नगरपालिकेचे अ, ब व क या वर्गात वर्गीकरण करण्यात आले.[4] लोकसंख्येनूसार नगरपालिकेचे वर्गीकरण व सदस्यांची संख्या पुढीप्रमाणे :–

**तक्ता क्रं– २.१**

**नगरपालिकेचे वर्गीकरण व सदस्य संख्या**

| वर्ग | कमीत कमी सदस्य संख्या | जास्तीत जास्त सदस्य संख्या | किमान मर्यादेपेक्षा सदस्य वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|
| 'अ' | ४० | ६० | ७५,००० लोकसंख्येनंतर प्रत्येकी ५००० लोकांना १ सदस्य. |
| 'ब' | ३० | ४० | ३०,००० लोकसंख्येनंतर प्रत्येकी ३००० लोकांना एक सदस्य. |
| 'क' | २० | ३० | १५,००० लोकसंख्येनंतर प्रत्येकी २००० लोकांना एक सदस्य. |

याशिवाय थंड हवेच्या ठिकाणासाठी तेथील लोकसंख्या १०,००० पेक्षा कमी असली तरी नगरपालिका स्थापन करण्याचा अधिकार राज्यसरकारला देण्यात आला आहे. इ.स. १९७० साली महाराष्ट्रात नगरपालिकांची संख्या २२१ एवढी होती.[५] पंढरपूर शहरांची लोकसंख्या १८८१ मध्ये १६,९१० एवढी होती. सध्या पंढरपूर शहराची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ९१,३७९ एवढी आहे. पंढरपूर शहरामध्ये पुरूषाची संख्या ४७,२८५ आणि स्त्रियांची संख्या ४४,०९४ एवढी आहे. सध्या पंढरपूर नगरपालिका 'ब' वर्गात मोडते. पंढरपूर नगरपालिकेची सदस्यसंख्या ३३ एवढी आहे.

**परिषद :**

भारतीय संविधनात ७४ व्या घटनादुरूस्तीने भाग – ९ ए समाविष्ट करून त्यामध्ये अनु २४३ पी ते २४३ झेड–जी हे अनुच्छेद समाविष्ट करून १२ वी अनुसूची जोडण्यात आली आहे.[६] प्रत्येक नगरपालिकेत एक परिषद असते. परिषद हा घटक नगरपालिकेचा महत्वाचा असा घटक आहे. परिषदेची सदस्यसंख्या ही जनसंख्येच्या आधारावर राज्यसरकार निश्चित करीत असते. नगरपालिकेची परिषद ही लोकप्रतिनिधीची सभा असते व त्यांची निवड ही प्रौढ सार्वत्रिक मतदान पध्दतीने निवडणूका शहरातील मतदाराकडून होते. नगरपालिकेमध्ये तीन प्रकारचे सदस्य असतात. १) निवडून आलेले सदस्य. २) स्वीकृत सदस्य ३) सरकारने नेमलेले सदस्य असे सदस्य असतात.[७] नगरपालिकेचे क्षेत्र लोकसंख्येच्या आधारे विविध विभागात 'वॉर्डात' विभागण्यात येते. प्रत्येक विभागातून एकच सदस्य निवडायचा (कलम १० (२)) ही महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मध्ये महत्वाची तरतूद आहे.[८] गुप्त मतदान पध्दतीने निर्वाचन होते व निर्वाचनाची दुरूस्ती कायदयाने राज्य निर्वाचन आयोगावर टाकण्यात आलेली आहे. निवडणूका पार पाडण्याची जबाबदारी राज्यसरकारने त्या त्या जिल्हाधिकाऱ्यावर टाकली आहे.[९] समाजातील कमकुवत घटकांना सामाजिक न्याय मिळावा यासाठी नगरपालिकेमध्ये स्त्रिया व अनुसूचित जाती– जमाती यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मध्ये कलम ९(२) व (३) नुसार स्त्रियांना अ व ब वर्गाच्य नगरपालिकेत किमान दोन व कमाल निवडून आलेल्या सदस्यांच्या दहा टक्के जागा ठेवण्यात येतात.[१०] नगरपालिकामधील राखीव जागांची अंमलबजावणी भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ३३४ नूसार केली जाते. नगरपालिकेचे सर्व अधिकार परिषेदेला असतात कारण परिषदेतील सभासद हे लोकनिर्वाचीत असतात. परिषद ही दोन महत्वाची कार्ये पार पाडते १) ध्येयधोरण ठरविणे २) ध्येयधोरणांच्या

अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे. नगरपालिकांना कारभार चालविण्यासाठी उपविधी निर्माण करण्याचा अधिकार आहे. हे उपविधी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमाच्या कलम ३२२ नुसार करण्याचा अधिकार नगरपालिकांना आहे. हे उपविधी या कायदयाच्या चौकटीत करावे लागते.[११] नगराध्यक्ष हा परिषदेला जबाबदार असतो कारण परिषद ही अध्यक्षांची निवड करीत असते. कोणत्याही विषयासंबंधीचे निर्णयाचे अधिकार हे परिषदेकडे असतात.समित्या निवडणे,मालमत्ता खरेदी–विक्रिकर बसविणे किंवा कराचा दर वाढविणे, नोकराची नेमणूक करणे त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करणे इ. अधिकार परिषदेला असतात.

**सदस्यांची पात्रताः**

भारताचा नागरिक असलेली व्यक्ती राज्यविधानमंडळाच्या सदस्यासाठीच्या पात्रता पूर्ण करणारी व्यक्ती नगरपालिका सदस्य होण्यास पात्र समजली जाते. नगरपालिका सदस्यत्वासाठी व्यक्तीचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असावे लागते.[१२]

**कार्यकाल :**

नगरपालिकांचा कालावधी पाच वर्षाचा आहे. हा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी नगरपालिका विसर्जित केली तर नगरपालिकेचा कालावधी कमी होऊ शकतो (अनु २४३प). नगरपालिका विसर्जित करण्यापूर्वी तिला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. नगरपालिका विसर्जित केलेल्या वेळेपासून सहा महिन्याच्या आत निवडणूका घेऊन नवीन नगरपालिका आस्तित्वात आणावी लागते.

**पदाधिकारी :**

नगरपालिकेचा दुसरा घटक हा अध्यक्ष असतो नगरपालिकेचा दैंनदिन कारभार हा नगराध्यक्षाच्या देखरेखीखाली चालत असतो. अध्यक्षाची निवड ही ठराविक पध्दतीने होत

असते. पूर्वी नगरसेवक त्यांच्यापैकी एकाची नगराध्यक्ष म्हणून निवड करीत तथापि सन २००२ मध्ये अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार नगरराध्यक्षांची निवड नगरपरिषद क्षेत्रातील सर्व प्रौढ मतदाराकडून प्रत्येक्ष थेट मतदान पध्दतीने केली जाते.[१३] नगरपरिषद सदस्य आपल्या सदस्यातूनच अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड ही बहुमताने करीत असतात. अध्यक्षाचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. नगराध्यक्ष हा वास्तव अर्थाने नगरप्रशासनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात आणि चर्चात्मक व कार्यकारी सत्ता प्रत्यक्षात वापर करीत असतात. नगराध्यक्ष नगरपरिषदेच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतात. नगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कामकाजावर देखरेख ठेवीत असतात तसेच तो नगरपालिकेच्या प्रशासन व प्रशासकीय खातेप्रमुख अधिकाऱ्यांच्या प्रमुख नियत्रंक असतो. सामाजिक व राज्य व राष्ट्रीय स्तरावर नगरपालिकेचे प्रतिनिधित्व नगराचा पहिला नागरिक व प्रतिनिधी या दृष्टीने नगराध्यक्ष असतो.

नगराध्यक्ष हा नगरपालिकेच्या स्थायी समितीचा पदसिध्द अध्यक्ष असतो. नगरपालिका व नगररहिवाशी अथवा शहरातील वादात नगराध्यक्ष समझोता घडवून आणू शकतो तसा अधिकार कायदयाने नगराध्यक्षाला प्राप्त झालेला आहे. नगराध्यक्षाला आर्थिक क्षेत्रात महत्वाचे कार्य करावे लागते. नगराध्यक्ष आपल्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकाऱ्याकडून वार्षिक अंदाजपत्रक तयार करवून घेतात. मुख्याधिकाऱ्याने तयार केलेले अंदाजपत्रक हे स्थायी समितीपूढे मांडले जाते व नगरपरिषदेची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर अंमलात येते. आणीबाणीच्या वेळी नगराध्यक्ष नगरपरिषद निधीतून खर्च करू शकतात. परंतु याला स्थायी समिती व नगरपरिषद यांची मान्यता घ्यावी लागते. नगराध्यक्षावर अविश्वास ठराव मांडता येतो. अविश्वासाच्या ठरावांची सूचना नगरपरिषद

सदस्य जिल्हाधिकाऱ्याकडे देतात. अविश्वास ठराव २/३ सदस्याच्या बहुमताने मंजूर करून ते जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवितात. २००१—२००७ या कालावधीमधील पंढरपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष पुढीप्रमाणे —

**तक्ता क्रं—२.२**

**पंढरपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष व कार्यकाल**

| अ. न | नगराध्यक्षाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १) | सौ. साळुंखे सुनिता विलासराव | १७/१२/२००१ ते ०९/१२/२००३ |
| २) | श्री. ताठे हरिष माधव | १०/१२/२००३ ते १८/१२/२००३ |
| ३) | सौ. साळुंखे सुनिता विलासराव | १९/१२/२००३ ते २४/११/२००४ |
| ४) | श्री. बोहरी इब्राहिम बशीर अहमद | २५/११/२००४ ते २९/११/२००४ |
| ५) | सौ. साळुंखे सुनिता विलासराव | ३०/११/२००४ ते ०९/१२/२००४ |
| ६) | श्री. बोहरी इब्राहिम बशीर अहमद | १०/१२/२००४ ते १५/१२/२००४ |
| ७) | सौ. साळुंखे सुनिता विलासराव | १६/१२/२००४ ते २३/०८/२००५ |
| ८) | श्री. जगदाळे दिलीप | २४/०८/२००५ ते २५/०८/२००५ |
| ९) | श्री. संकटनारायन मुधुकृष्णन | २६/०८/२००५ ते २८/१०/२००५ |
| १०) | सौ. साळुंखे सुनिता विलासराव | २९/१०/२००५ ते १६/१२/२००६ |
| ११) | श्री. परिमलसिंह | १७/१२/२००६ ते २०/१२/२००६ |
| १२) | श्री. शिरसट लक्ष्मण किसन | २०/१२/२००६ ते ३१/१०/२००७ |
| १३) | श्री. पलांडे संजीव | ०१/११/२००७ ते ०७/११/२००७ |
| १४) | श्री. धोत्रे दगडू नारायण | ०७/११/२००७ ते आजपर्यंत |

भारतीय स्वातंत्र्यानंतर पंढरपूर नगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष बी. जे. भुरजे (१९४७—४८) होते तसेच पंढरपूर नगरपालिकेच्या पहिल्या स्त्री अध्यक्ष सौ राजश्री प्रताप गंगेकर हया १७/१२/१९९७ ते १६/१२/१९९८ या कालावधीत नगराध्यक्ष होत्या.

नगरपालिकेची उपाध्यक्षाची निवड महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कायदयानुसार नगरपरिषद सदस्य आपल्या सदस्यामधून अप्रत्यक्षरित्या करीत असतात. १९७४ मध्ये नगराध्यक्ष प्रत्यक्ष निर्वाचित केल्यानंतर नगराध्यक्ष आपल्या पसंतीने उपाध्यक्षाची निवड करू लागले.[१४] उपाध्यक्ष नगराध्यक्षाच्या अनुपस्थितीत कार्य करत असतात. उपाध्यक्ष स्वखुशीने आपल्या पदाचा राजीनाम नगराध्यक्षाकडे देतात. इ. स. २००२ ते २००७ या कालावधीमधील पंढरपूर नगरपालिकेचे उपाध्यक्ष पुढीलप्रमाणे :–

**तक्ता क्रं–२.३**

**पंढरपूर नगरपालिकेचे उपाध्यक्ष व कार्यकाल**

| अ. न | उपाध्यक्ष | कालावधी |
|---|---|---|
| १) | श्री. ताटे हरिष माधव | २४/१२/२००२ |
| २) | श्री. बोहरी इब्राहिम ब. अहमद | २४/१२/२००३ |
| ३) | श्री. शिरसट लक्ष्मण किसन | २४/१२/२००४ |
| ४) | श्री. धोत्रे विठठ्ल शेट्टी | २३/१२/२००५ |
| ५) | श्री. भोसले नागेश आण्णासाहेब | ०६/०६/२००६ |
| ६) | सौ. कसबे शैलजा बाळासाहेब | २०/१२/२००६ |
| ७) | सौ. पवार आरती संतोष | २६/१२/२००७ |

पंढरपूर नगरपालिकेच्या पहिल्या स्त्री उपाध्यक्ष १९५३ मध्ये सौ. सुमतीबाई गणेश जोशी हया होत्या. १९७३ मध्ये झालेल्या ७४ व्या भारतीय घटनादुरूस्ती नुसार नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष याची पदे अनुसूचित जाती– जमाती आणि स्त्रियांसाठी राखीव ठेवलेली आहेत.[१५]

**नगरपालिका सभा :**

नगरपालिकेचे सर्व निर्णय सामुदायिकपणे घेतले जातात. नगरपालिकेच्या दोन प्रकारच्या सभा असतात. १) सर्वसाधारण सभा २) विशेष सभा. सर्वसाधारण सभा नित्य



15236

कामकाजासाठी बोलावली जाते. सर्वसाधारण सभेमध्ये अंदाजपत्रक संमत करणे, इतर गोष्टीबाबत निर्णय घेणे. विशेष कामासाठी म्हणजे नवीन कर बसविणे, अध्यक्षाविरूध्द ठराव आणणे इ. कामे विशेष सभेमध्ये केली जातात. नगरपालिका सदस्याची सर्वसाधारपणे एका महिण्यात एक सभा घेतली जावी असा नियम आहे. महाराष्ट्रामध्ये नगरपालिकांच्या वर्षभरात किमान सहा सर्वसाधारण सभा घेतल्या पाहिजेत असा नियम आहे.[१६] पंढरपूरमध्ये वर्षातून चार मोठया यात्रा भरत असतात. या यात्रेसाठी व यात्रेकरूसाठी सुविधा पुरवण्यासाठी यात्राकाळात नगरपालिकेच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सभा बोलावण्यात येते या सभेला सर्व कार्यकारी, प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिक्षक, इ. यांचा बैठकीत समावेश असतो.

## मुख्य कार्यकारी अधिकारी

नगरपालिकांची प्रशासकीय जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. नगराध्यक्षाच्या निर्देशास पात्र राहून नगरपालिकेच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्याधिकाऱ्यांवर असते. अ,ब व क वर्ग नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्याच्या बदल्या त्या त्या वर्गाच्या एका नगरपालिकेकडून दुसऱ्या नगरपालिकेकडे करण्याची तरतूद 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' च्या कायदयामध्ये आहे.[१७] नगरपालिकांच्या वर्गानुसार मुख्याधिकाऱ्याची पगारश्रेणी ठरविण्यात येते. 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' च्या कायदयाद्वारे नगरपालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती नगरपरिषद करीत असे. १९७४ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'म्युनिसिपल चिफ ऑफिसर केडर' निर्माण करून शासनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती होऊ लागली.[१८] सध्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून स्पर्धा परिक्षा घेऊन 'नगरपालिका मुख्याधिकारी सेवा' मधील अधिकाऱ्यांची निवड केली जाते.

**मुख्याधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये :**

मुख्य कार्यकारी अधिकारी हा नगरपालिकेच्या प्रशासनाचा प्रमुख कार्यकारी अधिकारी असतो. मुख्याधिकारी हा अध्यक्षांच्या नियंत्रण, मार्गदर्शन आणि देखरेखखाली नगरपालिकेचा आर्थिक आणि प्रशासकीय कारभार चालवितो. मुख्याधिकारी यांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. नगरपलिकेने घेतलेल्या सर्व निर्णयाची व ठरावांची अंमलबजावणी योग्य रितीने करणे.

२. नगरपालिकेच्या लेखी व नोंदणी पुस्तके यावर देखरेख ठेवणे.

३. अंदाजपत्रक तयार करून स्थायी समितीपुढे सादर करणे

४. नगरपालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कामावर देखदेख व नियंत्रण ठेवणे.

५. नगरपालिकेचा पैसा आणि तिची मालमत्ता यांच्या संबधात झालेली चोरी, अपहार किंवा हानी याबाबतची सर्व प्रकरणे अध्यक्षास व संबंधित समितीस कळविणे.

६. सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशांना अधीन राहून नगरपालिका लेखापरिक्षकाने दर्शविलेली नियमबाहयता दूर करण्यासाठी त्वरीत उपाययोजना करणे.

७. वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर देखरेख ठेवणे.[११]

वरील सर्व कार्ये मुख्याधिकाऱ्यांना पार पाडावी लागतात. ही कार्ये लक्षात घेता नगरप्रशासनाचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा मुख्य केंद्रच आहे. प्रशासकीय समज, कायदयाचे ज्ञान, धडाडी, समाजहित दक्षता, संपर्क ठेवण्याची कुवत यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कार्यक्षमता व नगरपालिका प्रशासनाचे यश तसेच नगरविकासाची गती अवलंबून असते. पंढरपूर नगरपालिकेतील २००२– २००७ या कालावधीमधील पंढरपूर नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुढीप्रमाणे आहेत.

तक्ता. क्रं— २.४

पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी व कार्यकाल

| अ. न | मुख्याधिकारी | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | श्री. डॉ. टेकाळे उदय | ३१/०१/२००१ ते २५/०४/२००२ |
| २) | श्री. माने मल्लिकार्जुन | २६/०४/२००२ ते १०/०५/२००२ |
| ३) | श्री. डॉ. टेकाळे उदय | ११/०५/२००२ ते ०१/०७/२००२ |
| ४) | श्री. मुळे अनिल. ह | ०२/०७/२००२ ते २६/०७/२००४ |
| ५) | श्री. पवार अे. यु. | २७/०७/२००४ ते ०८/०८/२००४ |
| ६) | श्री. मुळे अनिल. ह | ०९/०८/२००४ ते ०१/०५/२००६ |
| ७) | श्री. पवार अजय.उ | ०२/०५/२००६ ते १५/०५/२००६ |
| ८) | श्री.मुळे अनिल. ह | १६/०५/२००६ ते ०४/०५/२००७ |
| ९) | श्री. पवार बी. एस | ०४/०५/२००७ ते ०४/०६/२००७ |
| १०) | श्री. चिंतळे मंगेश. पा. | ०४/०६/२००७ ते ..................... |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ — ०७)

आजपर्यत पंढरपूर नगरपालिकेचे ५० मुख्य कार्यकारी अधिकारी झालेले आहेत. सध्या चिंतळे मंगेश हे ५१ वे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पंढरपूर नगरपालिकेमध्ये कार्यरत आहेत.

**समकक्ष अधिकारी वर्ग :**

नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याबरोबरच नगर पालिकेचा आकार, उत्पन्न इत्यादीनुसार समक्ष अधिकारीवर्ग ठरविला जातो. नगरपालिका इंजिनिअर, पाणीपुरवठा इंजिनिअर, आरोग्य अधिकारी, लेखा परिक्षक, शिक्षणअधिकारी व राज्यसरकार मंजूर करील असे इतर अधिकार इत्यादी अधिकारी वर्गाची निवड केली जाते. नगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यासंबधीच्या तरतूदी 'महाराष्ट्र नगरपालिका १९६५' च्या कायदयामधील कलम ७५ते८० मध्ये तरतूद आहे.[२०] अधिकारीवर्गाखेरीज इतर वर्गाची आवश्यकता लागते. त्यामध्ये वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, लेखापाल, अधीक्षक इत्यादी

वर्गाची नेमणूक करण्याचा अधिकार कलम ७६ नुसार नगरपालिकेस देण्यात आलेला आहे.[२१]

नगरपालिकेचे अधिकारी वर्ग व कर्मचारी यांनी त्यांच्या कामात हलगर्जीपणा, दुर्लक्ष, गैरवर्तन, अपहार इत्यादी वर्तन केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचा अधिकार मुख्याधिकारी व नगराध्यक्षंना असतो. परंतु कलम ७९(४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकाऱ्याविरूध्द जिल्हाधिकाऱ्याच्या मंजूरीशिवाय बडतर्फीचा आदेश देता येत नाही.[२२]

**पंढरपूर नगरपालिकेच्या विविध समित्या :**

कोणत्याही स्वायत्त संस्थेचे समिती हे एक महत्वाचे अंग असते. समितीचे अस्तित्व प्रकर्षाने नगरपालिका प्रशासनामध्ये आढळून येते. नगरपालिकेच्या कोणत्याही विषयावर अचूक असे निर्णय घेण्यासाठी समित्यांची स्थापना करण्यात येते. समितीचा कोणताही निर्णय हा सामुदायिकपणे घेतला जातो. ए. अॅस्टे या लेखकाच्या मतानुसार, 'समिती म्हणजे एका मोठया संस्थेने किंवा गटाने ठराविक कामकाजासाठी निर्माण केलेला लहानसा गट होय.[२३] नागरी प्रशासन प्रक्रियेत जनसहभाग फलद्रुप व्हावा व लोकप्रतिनिधींना निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करून स्थानिक स्वशासन वास्तव अर्थाने जबाबदार व्हावे या दृष्टीकोनातून नगरपालिकांना विविध समित्या निर्माण करण्याचा अधिकार महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कायदयाने दिलेला आपणास दिसून येतो.

समित्यांची रचना ठराविक पध्दतीची असते. एखादया प्रश्नांचा एकत्रितपणे अभ्यास करून निर्णय घेणे व तो निर्णय मूळ संस्थेला कळविणे हे समितीचे महत्वाचे कार्य असते. समितीचे सर्व सदस्य आपपसात चर्चा, विचार,– विनिमय करून सर्व सदस्य मिळून निर्णय घेत असतात.

## समित्यांचे प्रकार :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समित्यांचे दोन प्रकार आहेत. १. महाराष्ट्र शासन कायदयामधील तरतूदीनुसार स्थापन झालेल्या समित्या २. नगरपालिकांनी उपविधीनुसार स्थापन केलेल्या समित्या.

## स्थायी समिती :

नगरपालिकेच्या कामकाजात साहय करण्यासाठी 'महाराष्ट्र नगरपालिका कायदा १९६५' नुसार प्रत्येक नगरपालिकेत स्थायी समिती स्थापन करण्यात येते.[२४] पंढरपूर नगरपालिका ही 'ब' या वर्गात मोडते. अ व ब वर्ग नगरपालिकासाठी स्थायी समितीची तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

१. नगरपरिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिध्द अध्यक्ष असतो.

२. विविध विषय समित्यांचे सभापती या समितीचे पद्सिध्द सदस्य असतात.

३. नगरपरिषदेतील तीन सदस्याचा समितीत समावेश केला जातो.

स्थायी समितीतील तीन सदस्य हे निर्वाचित असतात. अ,ब वर्ग नगरपालिकांच्या स्थायी समितीतील सदस्यसंख्या ९ एवढी असते. नगरपालिकेच्या प्रशासनात समिती सदस्यांच्या अधिकाराना व मुदतीला महत्व प्राप्त झाले आहे. समितीची मुदत ही एका वर्षाची असते.[२५]

## स्थायी समितीचे अधिकार व कार्ये :

नगरपालिकेची परिषद स्थायी समितीचे विषय निश्चित करीत असते. ज्या विषयासाठी समित्या नियुक्त केलेल्या नाहीत ते विषय स्थायी समितीकडे सोपविले जातात. स्थायी समित्यांच्या निर्णयांना परिषदेची संमती असावी लागते. . स्थायी समितीला २ लाखापर्यंत वित्तीय मंजूरीची मर्यादा असते.

विषय समित्यामधील घेतलेले निर्णय स्थायी समितीकडे माहितीसाठी पाठविले जातात. स्थायी समिती आपले मत व्यक्त करून नगरपरिषदेकडे मंजूरीसाठी पाठवितात. स्थायी समिती ही कायमस्वरूपी कार्य करीत असते. स्थायी समितीची बैठक ही महिन्यातून एकदा होते. स्थायी समितीची स्थापना झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पहिली बैठक बोलविण्यात येते.

**विषय समित्या :**

नगरपालिका आवश्यकतेनुसार विषय समित्याची निवड करीत असते. अ व ब वर्गाच्या नगरपालिकांसाठी एकूण सहा विषय समित्या नियुक्त केलेल्या आहेत.

१. सार्वजनिक बांधकाम समिती
२. शिक्षण समिती
३. आरोग्य समिती
४. पाणीपुरवठा व जलःनिस्सारण समिती
५. नियोजन व विकास समिती
६. महिला व बालकल्याण समिती

विषय समित्यांच्या व्यतिरिक्त विशेष कार्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परवानगीने काही इतर विषय समित्या स्थापन करता येतात या समित्यामध्ये परिवहन समिती, विदयुत पुरवठा व उत्पादन समिती इ. विषयांचा समावेश होतो.

**विषय समित्यांची संरचना व अधिकार क्षेत्र :**

विषय समित्यांची सदस्यसंख्या नगरपरिषद ठरविते. विषय समित्यामधील सदस्यांची निवड क्रमदेय एकमतदान संक्रमित मते व प्रमाणशीर प्रतिनिधीत्व या पध्दतीने होत असते. कारण समितीतील सदस्य हे विविध पक्ष–गटातील असतात. एका सदस्यास एकाच विषय समितीचा सभापती होता येते. विषय समित्यांचे अधिकार क्षेत्र हे



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

समिती ज्या विषयासाठी नियुक्त केलेली असते त्या विषयापुरतीच मर्यादित असते. विषय समित्याचे निर्णय स्थायी समितीकडे माहितीसाठी पाठविले जातात. स्थायी समिती निर्णयावर आपली मते अजमावून नगरपालिकेकडे मंजूरीसाठी पाठवितात. स्थायी समितीप्रमाणेच विषय समित्यांच्या बैठका होत असतात. आवश्यकतेनुसार विशेष बैठकाही बोलावल्या जातात.

**विषय समित्याचे सभापती :**

सभापती हा समितीच्या सदस्यामधूनच निवडला जातो. एका सदस्याला दोन समित्यांचे सभापती होता येत नाही. सभापतीची मुदत एका वर्षाची असते. सभापतीला काही अधिकार प्राप्त झालेले आहेत ते पुढीलप्रमाणे :–

१. समितीची सभा बोलविणे

२. समितीच्या सभेच्या विषयाचा अग्रक्रम ठरविणे.

३. सभेची कार्यसूची ठरविणे.

४. खातेप्रमुखास समितीच्या सभेला हजर राहण्यास विनंती करणे.

५. समितीने घेतलेल्या योजनांशी संपर्क ठेवणे.

६. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची वेळोवेळी उत्तर देणे.

७. नगरपालिकेच्या सभेमध्ये समितीने ठेवावयाच्या योजना, ठराव, शिफारशी यांचे योग्य विवरण करणे.

८. समितीच्या अखत्यारीतील विषयासंबंधी योग्य ती आज्ञा देणे.[२६]

२००२—२००७ या कालावधीमधील पंढरपूर नगरपालिकेचे विविध विषय समितीचे सभापती पुढीप्रमाणे :

तक्ता क्रं —२.५

(1) नियोजन व विकास समिती सभापती व कार्यकाल

| अ. न | सभापतीचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | श्री. ताटे हरिष माधव | २००२ |
| २) | श्री. बोहरी इब्राहिम ब. अहमद | २००३ |
| ३) | श्री. शिरसट लक्ष्मण किसन | २००४ |
| ४) | श्री. धोत्रे विठठ्ल शेट्टी | २००५ |
| ५) | श्री. भोसले नागेश आण्णासाहेब | २००६ |
| ६) | सौ. कसबे शैलेजा बाळासाहेब | २००६ |
| ७) | सौ. पवार आरती संतोष | २००७ |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ — ०७)

तक्ता क्रं —२.६

(2) शिक्षण समिती सभापती व कार्यकाल

| अ. न | सभापतीचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | श्री. अभंगराव अनिल शशिकांत | २००२ |
| २) | श्री.मिसाळ धनंजय भगवान | २००३ |
| ३) | श्री. ताठे हरिष महादेव | २००४ |
| ४) | श्री. ताठे हरिष महादेव | २००५ |
| ५) | श्री. कुलकर्णी सचिन हणमंत | २००६ |
| ६) | श्री. घंटी पांडूरंग पुडंलिक | २००७ |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ — ०७)

### तक्ता क्रं –२.७

### (3) आरोग्य समिती सभापती व कार्यकाल

| अ. न | सभापतीचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | सौ. गोसावी वृदादेवी मुन्नागीर | २००२ |
| २) | सौ. काकडे अलका महादेव | २००३ |
| ३) | श्री. अधटराव गणेश विजय | २००४ |
| ४) | श्री. यादव नागनाथ प्रल्हाद | २००५ |
| ५) | श्री. सर्वगोड सुनिल दिगंबर | २००६ |
| ६) | श्री. नेहतराव सुरेश वसंतराव | २००७ |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ – ०७)

### तक्ता क्रं –२.८

### (4) सार्वजनिक बांधकाम समिती सभापती व कार्यकाल

| अ. न | सभापतीचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | श्री. यादव नागनाथ प्रल्हाद | २००२ |
| २) | श्री. घंटी पांडूरंग पुडंलिक | २००३ |
| ३) | सौ. धुमाळ सुजाता सुधाकर | २००४ |
| ४) | सौ. डोंबे सुलोचना नंदकुमार | २००५ |
| ५) | श्री. राऊत तुकाराम रामहरी | २००६ |
| ६) | श्री. कमले रणजित बलभिम | २००७ |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ – ०७)

तक्ता क्रं –२.९

(5) पाणीपुरवठा व जलःनिस्सारण समिती सभापती व कार्यकाल

| अ. न | सभापतीचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | श्री. उस्ताद महंमदहुसेन अब्दुलहक | २००२ |
| २) | श्री. देवभोरे विजया राजेंद्र | २००३ |
| ३) | सौ. अदापुरे हिराबाई विठ्ठल | २००४ |
| ४) | सौ. कुलकर्णी शोभा हणमंत | २००५ |
| ५) | श्री. अधवटराव गणेश विजय | २००६ |
| ६) | श्री. डांगे सचिन बालाजी | २००७ |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ – ०७)

तक्ता क्रं –२.१०

(6) महिला व बालकल्याण समिती सभापती व कार्यकाल

| अ. न | सभापतीचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १) | सौ. डोंबे सुलोचना नंदकुमार | २००२ |
| २) | सौ. कुलकर्णी शोभा हणमंत | २००३ |
| ३) | सौ. मेटकरी सुशिला भिम | २००४ |
| ४) | सौ. नेहतराव सुनिता आबासो | २००५ |
| ५) | सौ. देवमारे विजया राजेंद्र | २००६ |
| ६) | कु. ननवरे सुप्रिया सुभाष | २००७ |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ – ०७)

समितीचा प्रकार व त्या समितीने अवलंबिलेली चर्चापध्दती यावंर सभापतीचे कार्य अवलंबून असते. समितीचा कार्यक्रम व उद्देश साधण्यासाठी सभापती महत्वाचा वाटा उचलतात. समितीच्या सभेचे कामकाज नीटनीटकेपणाने चालविणे हे सभापतीच्या कौशल्य व ज्ञानावर अवलंबून असते. प्रत्येक समिती आपल्या विषयाच्या कारभारावर देखरेख ठेवते व मार्गदर्शन करते.

**नगरपालिकांच्या उत्पन्नाची साधने :**

स्थानिक स्वशासन संस्थांची प्रमुख समस्या आर्थिक साधनांची कमतरता आहे. ७४ व्या भारतीय राज्यघटना दुरूस्ती कायदा १९९३ ने राज्य वित्त आयोगाने राज्यशासन व नगरपालिका यातील उत्पन्नाचे वाटप, कर निश्चिती, टोल, फी, अनुदाने, जकाती इत्यादीसंबंधी अभ्यास, चर्चा करून अहवाल सादर करावा असे सूचविले आहे. नागरी संस्थाच्या उत्पन्नाची साधने तीन भागात विभागलेली आहेत. १) कर २) अनुदान ३) इतर उत्पन्न कर. नगरपालिकांना दोन मार्गाद्वारे अर्थपुरवठा केला जातो १) राज्यसरकारकडून मिळणारे अनुदान २) पालिकांना इतर मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न.

महाराष्ट्र राज्यात सक्तीचे व ऐच्छिक कर बसविण्याच्या पध्दती वेगवेगळया आहेत. ऐच्छिक कर बसविण्यासाठी नगरपालिकेला उपविधी तयार करून राज्य प्रशासनाची परवानगी घेऊन कर आकारता येतो. ऐच्छिक कर रदद् करण्यासाठी राज्यप्रशासनाची संमती घ्यावी लागते. इ.स. १९७३—७४ साली २२२ नगर पालिकांचे उत्पन्न रू.३७ कोटी होते.[२७] नगरपालिका आकारीत असलेला सर्वात जुना कर म्हणजे मालमत्ता कर आहे. हा कर नगरपालिकांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. मालमत्ता कर यामध्ये घरावरील कर, पाण्यावरील कर, सांडपाण्याच्या व्यवस्थेवर कर, साफसफाई बाबतचा कर आणि दिवाबत्ती कर इ. बाबीचा समावेश होतो. महाराष्ट्रात कर—आकारणीची यादी तयार करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची आहे. नगरपालिकांच्या उत्पन्नाचे दुसरे महत्वाचे साधन म्हणजे जकात कर हा आहे. भारतीय राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टात राज्यसरकारच्या कक्षेत येणाऱ्या करांच्या यादीत

जकात कराचा उल्लेख आहे.[२८] जकात कर नगरपालिकेच्या हद्दीत उपयोग विक्रीकरिता किंवा खाण्यासाठी आणल्या जाणाऱ्या वस्तूंवर-आकारला जातो. सध्या पंढरपूर नगरपालिकेने जकात कर रदद् केला आहे.

नगरपालिकांना मिळणारे शासकीय अनुदान हे नगरपालिकांच्या महसूलाचे उत्पन्नाचे मुख्य साधन नसते. राज्यशासन पुढील कारणासाठी दरवर्षी रक्कम अनुदान म्हणून देते. त्यामध्ये पाणीपुरवठा, जलविकास, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, बॉम्बे टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९५४ अन्वये नगरपालिकांनी स्वीकारलेल्या विकास योजना व नगररचना योजना, नगरपालिकेचा अधिकारी वर्ग व सेवक वर्ग यांचा महागाई भत्ता, अधिकाऱ्यांचे सामान्य संवर्ग स्थापन झाले असेल तर त्यातील अधिकाऱ्यांचा पगार, सार्वजनिक आरोग्य, अग्निशमन व्यवस्था, रस्तेबांधणी व दुरूस्ती, राज्यसरकार वेळोवेळी ठरवतील ती सुखसोई इ. गोष्टींचा समावेश होतो.[२९] इ.स.१९१४ च्या 'लोकल ॲथॉरिटीज लोन्स' या कायदयाने स्थानिक स्वराज्य संस्थाना कर्ज उभारण्याचे अधिकार दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाना कर्ज उभारण्यासाठी राज्यसरकारची परवानगी घ्यावी लागते. पाणीपुरवठा व सांडपाणी वाहून नेण्याबाबतच्या योजनासाठी लागणाऱ्या कर्ज रक्कमा घेण्याचा अधिकार या संस्थांना आहे.[३०]

## २००२ — २००७ या कालावधीमधील तपशीलवार पंढरपूर नगरपालिकेचे उत्पन्न व कर

### तक्ता क्र– २.११

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| | प्रांरभिक शिल्लक | ५२,४५,६९७ | १,३७,४०,३९२ | २,८९,८४,६८० | ४८१०४५५७ | ३०३५३६६५ |
| (अ) | नगरपालिका कर व दर | | | | | |
| | जमिनीवरील आणि इमारतीवरील कर | | | | | |
| १ | सर्वसाधारण कर | १४९००७०५ | १७०६३१९४ | १७१०६७३३ | २१२४७९२६ | १८०४५००० |
| २ | जकात | ० | ० | — | — | — |
| ३ | सिनेमा, नाटयगृहे, सर्कशी, जत्रा, प्रदर्शन यावरील कर | ४३२५० | ४३८९० | ३९४५० | ४१००० | ४२००० |
| ४ | जाहिरातीवरील कर (वृतपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिराती व्यतिरिक्त) | २६५१५१ | २८२३३७ | २१८६१६ | १७०००० | २००००० |
| ५ | सर्व वाहने (मोटार वाहन अधिनियम 1931 यामध्ये व्याख्या केलेली मोटार वाहने वगळून) नौका आणि प्राणी यावरील कर | ० | — | — | — | — |
| ६. | वाहने आणि प्राणी यावरील पथकर | ० | — | — | — | — |
| ७ | विशेष स्वच्छता कर | ८९२५४१ | ५८०५२७ | ६०२६३० | ७४५००० | ६१८००० |
| ८ | जलनिस्सारण कर | १७७४१२२ | २०२४८२३ | २३२३८९७ | २९५५००० | २५८७००० |
| ९ | पाण्यावरील विशेष कर | ९१२६७०२ | १३३४५९९५ | १३१५०३५८ | १७४००००० | १३५००००० |
| १० | वृक्षकर | ५३८४३२ | ५२११७० | ६२६२५५ | ८०५००० | ७६०००० |
| ११ | आरोग्य व्यवस्था कर व पार्कींग | २१६६८३५ | १७६४३०० | २५४७२१३ | २०२८३४० | २२३२००० |

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| १२ | सार्वजनिक पाणी आकार | १८६५३७ | ३०५७६२ | २९७२६६ | ७०००००० | ३००००० |
| १३ | अनधिकृत बांधकाम कर | १४६०२४ | १४५९१८ | — | — | — |
| १४ | बेअर कनेक्शन पाणीपटट्री | ० | ० | — | — | — |
| १५ | विशेष शिक्षण कर | १३८१३५३ | १३८७०९५ | १५४१८११ | २१००००० | १८००००० |
| | **'अ' मधील एकूण रक्कम** | **३१४२१६५२** | **३७४६५०११** | **३८४५४२२९** | **४८१९२२६६** | **४००८४०००** |
| **(ब)** | **विशेष अधिनियमाखाली वसुली** | | | | | |
| १६ | अन्न भेसळ प्रतिबंधक | ९१६७५ | १६५५९९ | १००२४४ | ६८००० | २००००० |
| १७ | गुमास्ता कायदा | ३९०४५ | ० | ० | ० | ० |
| | **'ब' मधील एकूण रक्कम** | **१३०७२०** | **१६५५९९** | **१००२४४** | **६८०००** | **२०००००** |
| **(क)** | **नगरपालिकेची मालमत्ता आणि सेवा यांच्यापासून मिळालेली महसूल आणि कर आकारणी व्यतिरिक्त शक्तीपासून मिळालेले उत्पन्न** | | | | | |
| १८ | जागा भाडे | ४०१५०५ | ५४५६१८ | २६५५२४ | २७२८११० | ३००००० |
| १९ | इमारतीचे भाडे व शॉपिंग सेंटर भाडे | ५१९०५९१ | ५१४५८८५ | ५५४२९९५ | ४०००००० | ४५००००० |
| २० | शॉपिंग सेंटर डिपॉझिट | २२९००९१ | १२२८७०१ | १८९७७९६ | १११०४२८ | १०००००० |
| २१ | जागा विक्रि | १७२२९५० | ४१७४२१० | १८३४ | ३२००००० | १००००० |
| २२ | उदयानापासून मिळणारे उत्पन्न | २९४४४७ | ३१५७७० | २७३७४९ | २३३९७९ | २७५००० |
| २३ | शैक्षणिक परिसंस्थेपासून मिळणारे उत्पन्न | ६८६६ | ५२८२ | ४५६९ | २५९८ | ३००० |

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| २४ | वैदयकीय परिसंस्थेपासून मिळणारे उत्पन्न | ५२९९५८ | ६४९८४९ | ६९३५४० | ५६९०५५ | ५५००००० |
| २५ | बांधकाम लायसन्स फी | २१००० | २५००० | १०००० | १००००० | १००००० |
| २६ | झोपडपट्टी सेवा शुल्क | ४२१६५१ | २४४२३७ | ४१८६१० | २००००० | ८००००० |
| २७ | सार्वजनिक बाजारपेठेच्या मालाच्या विक्रीकरिता वापर किंवा विक्रीसाठी मांडणेच्या अधिकरासाठी फी | ६१०७३० | ६४४५०२ | ५५७०४९ | ९३६००० | १०००००० |
| २८ | पार्कींग फी | ३२५१९३ | ० | ० | ० | ० |
| २९ | नगरपालिका कत्तलखान्यात कत्तलीसाठी आणलेल्या प्राण्यावरील फी | १०३८४ | १९१२८ | २०१९८ | १४५०० | १४५०० |
| ३० | खाजगी नळ जोडणीद्वारे केलेल्या पाणीपुरवठयाची फी | ३७५२२ | २१५४९ | १४७४१ | २५००० | २५००० |
| ३१ | ना हरकत व थकबाकी ना हरकत दाखला फी | १८६०० | १७१०० | १२१०० | १३००० | १३००० |
| ३२ | पाण्याच्या नळजोडणीची फी | ४५३०० | ५०४०० | ५४६०० | ५०००० | ५०००० |
| ३३ | जन्म मृत्यु लेट फी भारणा | ३७६५ | ३५३० | २०१० | ३५०० | २००० |
| ३४ | टॅकरने पाणी पुरवठा फी | २३६८८ | ३२३९३ | १३५४० | ३०००० | ३०००० |
| ३५ | तात्पुरते मंडप फी | २९२३७ | ३०५७६ | ६२६१९ | ३०००० | ४०००० |

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| ३६ | इमारत परवाना फी, सज्जा+फळी +पायरी | २७९२० | २६६५८ | २६३८६ | ४१००० | २४००० |
| ३७ | नोटीस फी | ५२०००६ | ४३९९९७ | ४२६३८२ | ७००००० | १००००० |
| ३८ | वॉरंट फी | ३२६७४८ | २७०५६० | २८५९१८ | ६००००० | १००००० |
| ३९ | अतिक्रमण चार्जस /दररोज रस्ता फी | १५६६१८५ | १३६१९३६ | २०६३३३६ | १७०००००० | १७००००० |
| ४० | भयंकारक अपायकारक फी | १०१२७ | ३६४८७ | ६१५६४ | १००००० | १००००० |
| ४१ | मालमत्ता नाव दाखला फी | १००५०० | ९७३०० | १३०९०० | ८४९०० | ११०००० |
| ४२ | मालमत्ता हस्तांतरण फी | ६०००० | १३०० | ० | ० | २००००० |
| ४३ | मठावरील स्वच्छता फी | ० | ८८०० | ० | १५००० | १५००० |
| ४४ | कत्तलखाने स्वच्छता फी | ० | १५७०० | ० | ० | ० |
| ४५ | प्लॉट बिगरघरगुती कारणेकामी ना हरकत दाखला फी | ० | १०३५० | ० | ० | ० |
| ४६ | विशेष विकास आकार | ० | ० | — | — | — |
| ४७ | गुंटेवारी विकास प्रशुमन (शुल्क) | २२२७१० | २१८९६२३ | ७८०४०७ | १०००००० | १०००००० |
| ४८ | बांधकाम विभाग झोपडपटट्री सेवा | २२६४०० | ६६९०० | ३३७६५ | ४०००० | ४५००० |
| | **'क' मधील एकूण रक्कम** | **१५०४४०७४** | **१७६७९३४१** | **१३६५७१३२** | **१७५२७०७०** | **१२१९६५००** |
| **(ड)** | **अनुदाने व अंशदाने** | | | | | |
| ४९ | रस्ता अनुदान | ० | १८३७७४६ | ८९३८२३६ | ११९८५३० | ११९८००० |
| ५० | कुटुंब नियोजन | १०७१४०४ | ३६०७६३ | १५१७०३५ | ४४८००० | ५००००० |
| ५१ | माध्यमिक शिक्षण नॉन सॅलरी अनुदान | ० | ० | — | — | — |
| ५२ | तातडीची पाणीपुरवठा योजना | ४४४००० | ६०९००० | ० | ० | १०००० |

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| ५३ | महागाई भत्ता | १२८७०३१६ | १९२१०९०२ | ३१९७४२९६ | २१२०००००० | २१२०००००० |
| ५४ | क्रिडासंकुल उभारणी अनुदान | ० | ० | २०००००० | ५००००० | ५००००० |
| ५५ | अकरावा वित्त आयोग अनुदान | ६३९६००० | ८१५७६६४ | २९७८२८२ | ३०००००० | ३०००००० |
| ५६ | जमीन महसुल बिगर शेती सारा अनुदान | ४८०८२ | २२२०३१ | २६१५४१३ | ४४१४२०० | २६००००० |
| ५७ | मुंबई वाहन कर अनुदान | २४७७ | ० | १०१६८ | १०१६८ | १०१६८ |
| ५८ | घर तेथे शौचालय अनुदान | ० | ० | ० | ० | ० |
| ५९ | अल्पबचत प्रोत्साहन अनुदान | ७३८२ | ७७५८ | ७८०३ | ८००० | ८००० |
| ६० | पंतप्रधान एकात्मिक नागरीदारिद्रय निर्मूलण अनुदान | ० | ० | — | — | — |
| ६१ | करमणुक कर अनुदान | ६१०३१४ | ३३७२४८२ | ६८६०००१ | ३१८१५०१ | ३०००००० |
| ६२ | हिवताप निर्मूलन अनुदान | १६६६५२७ | ६८१६६७ | ५७४१२८ | ५२१००९० | २२४३००० |
| ६३ | हुतात्मा स्मारक अनुदान | ० | ० | ० | ० | ० |
| ६४ | झोपडपट्टी सुधारणा अनुदान | ० | ० | — | — | — |
| ६५ | न्यायालयीन दंड अंशदान | ६७७ | २१८७ | ० | २२०० | २२०० |
| ६६ | राष्ट्रिय गलिच्छ वस्तीसुधारणा अनुदान | ३७४३३५ | ० | ३१६७८५ | १७९७८७८ | १५००००० |
| ६७ | खासदार निधी | ० | ५१०००० | ५९००० | ० | ० |
| ६८ | आमदार निधी | ० | ० | २९०००० | ० | ० |
| ६९ | तंत्रशिक्षण अनुदान | ० | ० | — | — | — |
| ७० | दलितवस्ती सुधारणा अनुदान | २२५०००० | ० | ५८९८३६२ | ११४०००० | ११४०००० |
| ७१ | नागरीसामाजिक वनीकरण अनुदान | ० | ० | — | — | — |

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| ७२ | जंतुनाशके व मास इनॉकलेशन अनुदान | ० | ० | — | — | — |
| ७३ | यात्राकर अनुदान | ५०००००० | ५००००००० | ५०००००० | ५०००००० | ५०००००० |
| ७४ | विकास आराखडा यु. डी.सहा अनुदान | २७०००० | ० | ० | १७१५००० | १३८०००० |
| ७५ | विकास आराखडा यु. डी.सहा कर्ज | २७०००० | ० | ० | १४९०००० | ८९०००० |
| ७६ | जनगणना अनुदान | ० | ० | — | — | — |
| ७७ | मुंबई पोलिस ॲक्ट अनुदान | ० | ० | ० | ५३ | ५३ |
| ७८ | मुद्रांक शुल्क अनुदान | ११०९३६ | ७७०६६७ | ० | ११६९१६० | ५००००० |
| ७९ | सुवर्ण जंयती शहरी रोजगार योजना | ६४१३८० | ५६३५६५ | ३०७४२३ | ५००००० | ३००००० |
| ८० | मुख्याधिकारी रजा रोखीकरण | ० | ० | — | — | — |
| ८१ | तिर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा क्रं. २ | ० | ० | ० | ० | ० |
| ८२ | टी.सी.एल. पावडर अनुदान | ५५००० | २७३०० | ० | ७३१३३ | ५२५०० |
| ८३ | जकात अनुदान | ३३३३२००० | ४२११९७९५ | ३३३७८२६५ | ४२२६८९१५ | ३९४७४०० |
| ८४ | गांडुळ शेती अनुदान | ० | ० | — | — | — |
| ८५ | एकात्मिक शहर विकास योजना | ० | ११६६७०० | १०००००० | ४००००० | १५००००० |
| ८६ | जन्म—मृत्यु अनुदान | ० | ० | ० | ० | ० |
| ८७ | उर्वरित वैधानिक विकास महामंडळ | ० | ० | ० | ११९७००० | २६००००० |
| | 'ड' मधील एकूण रक्कम | ६५४२०८३० | ८६६२०२२७ | १०३७२५१९७ | ९५९२३८२८ | ८८६०७९२१ |
| (इ) | संकिर्ण | | | | | |
| ८८ | नगरपालिका गुंतवणुकीवरील व्याज | ५६६७३०० | २५७४३३७ | ३०६८८८३ | २७७०५२० | २५००००० |
| ८९ | कराव्यतिरिक्त साफसफाईच्या रक्मा | ६७४१५ | ३९६०० | ७४३१३ | ७७४९६ | ५०००० |
| ९० | प्रतिलिपी ताडून पाहण्याची फी | १०२०५५ | १२१९०७ | २०२२३६ | २४४८९८ | २६५००० |

| लेखा शिर्ष | | प्रत्यक्ष रक्कम व साल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
| ९१ | शहरातील केर कचरा व खत यांची विक्री | ५२६०० | ५५००० | १८००० | ५०००० | ५०००० |
| ९२ | विवाह समारंभ सेवा शुल्क | १६५००० | १६५५०० | १११५०० | ११६९५७ | ११०००० |
| ९३ | मतदार यादया आणि नगरपालिका प्रकाशनाच्या विक्रीचे उत्पन्न | ० | ० | ० | १५४५ | १२००० |
| ९४ | जुन्या भांडारांच्या विक्रीचे उत्पन | ० | ० | ६३७५ | १००० | १०००० |
| ९५ | ऑडीट रिकव्हरी | ७६३६८ | ८०२६९ | ३४२०९ | ७५००० | ७५००० |
| ९६ | फोन फी | १५८१ | ० | ० | ० | ० |
| ९७ | विकास शुल्क | २१६९४९५ | १३५२९३४ | १९४२७७४ | २७००००० | २७००००० |
| ९८ | रोजगार हमी कर रिबेट | १७२०६ | ३३००३ | ४५३७६ | २२००० | २३००० |
| ९९ | शिक्षण सेस रिबेट | ३०८९ | ११६७५८ | ८७४७६ | १२५००० | १२९००० |
| १०० | इतर जमा रकमा | ९६६९३६ | ८०५३१३ | १७७५२८४ | ८००००० | ८००००० |
| १०१ | सांडपाणी विक्री | ० | ० | — | — | — |
| १०२ | संगणक अनुदान | ० | ० | ७६८२१ | ० | ० |
| १०३ | संत गाडगेबाबा अभियान बक्षीस | ० | ० | ३००००० | ० | ० |
| १०४ | स्कुल डेव्हलप फंड | ८३३८९३ | १००० | ० | ० | ० |
| | **'इ' मधील एकूण रक्कम** | **१०१२२९३८** | **५३४५६२१** | **७७४३२४४** | **६९८४४१६** | **६७२४०००** |
| | **अ+ब+क+ड+इ मधील एकूण महसूल रक्कम** | **१२२१४०२१४** | **१४७२७५७९९** | **१६३६८००४६** | **१६८०९५५८०** | **१४७८१२४२१** |
| | **एकूण महसूल प्रारंभिक शिल्लकेसह** | **१२७३८५९११** | **१६१०१६१९१** | **१९२६६४७२६** | **२१६८००१३७** | **१७८१६६०८६** |

(पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल २००२ — ०७)

### राज्यशासनाचे नगरपालिकांवरील देखरेख व नियंत्रण –

स्थानिक स्वराज्य संस्था हया सार्वभौम संस्था नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थावर विधानसभा, राज्यसरकार आणि न्यायालये यांचे नियंत्रण असते. नगरपालिकांना प्रशासन कार्यात साहय करण्यासाठी राज्यपातळीवर 'नगरपालिका प्रशासन संचालक' या अधिकाऱ्याची नेमणूक कायदयान्वये करण्यात आली आहे.[३१] नगरपालिकेच्या कारभारावर सर्वसाधारण देखरेख ठेवण्याचे अधिकार प्रशासकाला देण्यात आले आहेत. नगरपालिका किंवा तिची समिती यांचा एखादा ठराव कायदयाच्या कक्षेबाहेरील व नागरिकांचे नुकसान करणारा असेल तर त्याची अंमलबजावणी स्थगित करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी व नगरपालिका प्रशासन संचालक यांना आहे. एखादया नगरपालिकेकडून गंभीर स्वरूपाचे अपप्रकार होऊ लागल्यास त्याची चौकशी करण्याचा व आवश्यक वाटल्यास ती नगरपालिका बरखास्त करून प्रशासक नेमण्याचा अधिकार राज्यशासनाला आहे.

# संदर्भ सूची


१. भोगले शांताराम – 'भारतातील स्थानिक शासन', विदया प्रकाशन, नागपूर, जून १९९० पृ. क्र. ८१.

२. उपरोक्त – पृ. क्र ८१ .

३. प्रा. कुलकर्णी. अ.ना– 'भारतातील स्थानिक शासन' विदया प्रकाशन नागपूर, फेब्रुवारी २०००, पृ. क्र १७८.

४. उपरोक्त – पृ. क्र १७८ .

५. तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री– मराठी विश्वकोष खंड – ८ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई– १९७९, पृ.२७७.

६. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण – 'भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर जून २००३. पृ. क्र ३५८.

७. डॉ. बढे. जी.एस – भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था' (उद्‌गम व विकास) हिमालया पब्लिशींग हाऊस. मुंबई– १९७८, पृ. क्र ४९

८. जोशी व. शं,जोशी प.व.कायमखाने लीला.कृ – 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५,' न्यायदिप प्रकाशन १९९१, पृ. क्र ११०—१११.

९. तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोष खंड – ८ पृ. क्र २७८.

१०. जोशी व. शं,जोशी प.व.कायमखाने लीला.कृ – 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५,' न्यायदिप प्रकाशन १९९१, पृ. क्र ५७.

११. जोशी व. शं,जोशी प.व.कायमखाने लीला.कृ – 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५,' न्यायदिप प्रकाशन १९९१, पृ. क्र ४४.

१२. डॉ. विभूते भालबा – 'भारताचे संविधान' मनोविकास प्रकाशन जुलै २००० पृ. क्र १८१

१३. पाटील व्ही.बी – भारताची राज्य घटना, के सागर प्रकाशन, पुणे– २००१, पृ.क्र.३३५.

१४. प्रा. कुलकर्णी अ. ना– 'भारतातील स्थानिक शासन' विदया प्रकाशन फेब्रु २००० पृ. क्र १८१

१५. प्रा. कुलकर्णी अ. ना– उपरोक्त पृ. क्र १८२

१६. डॉ. बढे जी. एस– 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था हिमालया पब्लिशर्स हाऊस मुंबई १९७८ पृ. क्र ७६

१७. जोशी व. शं,जोशी प.व.कायमखाने लीला.कृ – 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५,' न्यायदिप प्रकाशन १९९१, पृ. क्र १५६.

१८. प्रा. कुलकर्णी अ. ना– उपरोक्त ,पृ. क्र १८२–१८३.

१९. जोशी व. शं,जोशी प.व.कायमखाने लीला.कृ – 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, न्यायदिप प्रकाशन १९९१, पृ. क्र १६१,१६२.

२०. उपरोक्त – पृ. क्र १५६.

२१. उपरोक्त – पृ. क्र १५६,१५७.

२२. उपरोक्त – पृ. क्र १६६.

२३. डॉ. बढे जी. एस– उपरोक्त – पृ. क्र ६१.

२४. प्रा. कुलकर्णी अ. ना– 'भारतातील स्थानिक शासन' विदया प्रकाशन, फेब्रु २००० पृ. क्र १८४.

२५. डॉ. बढे जी. एस– 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था हिमालया पब्लिशर्स हाऊस मुंबई १९७८ पृ. क्र ६५.

२६. उपरोक्त – पृ. क्र ६८.

२७. उपरोक्त – पृ. क्र ९७.

२८. उपरोक्त – पृ. क्र १०१.

२९. तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोष खंड – ८ पृ. क्र २७९.

३०. डॉ. बढे जी. एस – उपरोक्त ,पृ. क्र १११.

३१. तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोष खंड – ८ पृ. क्र २७९.